# पवित्र शास्त्राचे अवलोकन, भाग 1-66 पुस्तकांचे सर्वेक्षण, हे देवाचे वचन आहे

मुलांना शिकविणाऱ्यांनी B3b हा अभ्यास वाचावा.

## 1. पवित्र शास्त्राच्या सर्व भागांचे अवलोकन करून ते सूज्ञपणे आचरणात आणा.

**प्रार्थना** ''देवाच्या आत्म्या तुझ्या वचनातील निरनिराळे भाग मला समजावून घेऊ दे म्हणजे तुझ्या लोकांना ते सूज्ञपणे आचरणात आणण्यास मला मदत करता येईल.''

### अ. पवित्र शास्त्राविषयीची वस्तुस्थिती:

- पवित्र शास्त्र हा देवाचा संदेश असून त्याचे दोन मुख्य भाग आहेत. पहिल्या भागाला जुना करार म्हणतात. त्यात 39 पुस्तके असून ती हिब्रू व अरामिक भाषेत लिहिलेली आहेत (अरैमिक ही प्राचीन सिरीयन भाषा हिब्रू भाषेला जवळची होती). नव्या करारामध्ये 27 पुस्तके असून ती ग्रीक भाषेत लिहिली आहेत.



- जुन्या कराराने येशूच्या आगमनासाठी इस्राएल लोकांची तयारी केली. याने त्यांना मुख्य आध्यात्मिक संज्ञा शिकविल्या आणि त्यांना देवाच्या पवित्र नियमाचे त्यांच्या स्वत:च्या प्रयत्नांनी आज्ञापालन करता येणार नाही हे दाखवून दिले.

### ब. जुन्या व नव्या करारातील साहित्याचे प्रकार

**जुना करार**

- कराराचा मुख्य आधार जगाचा आरंभ, प्राचीन कुलपतींचा इतिहास आणि देवाचे प्राचीन नियमशास्त्र मोशेचे ग्रंथपंचक, उत्पत्ती ते अनुवाद
- ऐतिहासिक प्राचीन इस्राएल राष्ट्रातील गोष्टी, 12 पुस्तके, यहोशवा ते एस्तेर.
- भक्तिविषयक व बोधपर हिब्रू काव्य ईयोब ते गीतरत्न.
- भविष्यसूचक. जुन्या करारातील संदेष्टे 17 पुस्तके, यशया ते मलाखी.

  देव मोशेशी कसा बोलला ते **गणना** 12:6-8 मध्ये पाहा.

  देवाने मोशेची इतर संदेष्ट्यांशी कशी तुलना केली ते **अनुवाद** 34:10 मध्ये पाहा.

देवाने मोशेची तुलना येशूशी कशी केली ते **योहान** 1:17 मध्ये पाहा. मोशे हा जुन्या करारातील सर्वात श्रेष्ठ संदेष्टा होता. इतर संदेष्ट्यांनी प्रामुख्याने मोशेच्या नियमशास्त्राचा उलगडा करणारे व ते आचरणात कसे आणायचे याविषयाचे लिखाण केले.

**नवा करार**

- कराराचा मुख्य आधार- येशूचे कार्य व शिकवण. चार पुस्तके - मत्तय ते योहान.
- ऐतिहासिक- प्रेषितिय मंडळ्या, 1 पुस्तक - प्रेषितांची कृत्ये.
- भक्तिविषयक व बोधपर- नवीन मंडळ्या व पुढाऱ्यांना लिहिलेली पत्रे. रोमकरांस पत्र ते यहूदाला पत्र.
- भविष्यसूचक- प्रेषित योहानाचा दृष्टांत. 1 पुस्तक प्रकटीकरण.

## क. पवित्र शास्त्रातील पाच 'करारांतून' देव लोकांशी कसा वागतो याचे मार्गदर्शन मिळते

1) स्वयंशिस्तीचा करार एखाद्याच्या सद्सद्विवेकबुद्धीनुसार हा करार आदामाशी केला आदामापासून अब्राहामपर्यंत, उत्पत्ती 1-12.

**मूळ उगम**- देवाने पहिल्या मनुष्याला सांगितले की त्याने बऱ्या-वाईटाचे ज्ञान करून देणाऱ्या झाडाचे फळ खाल्ले तर तो मरेल. सैतानाने खोट्या धर्माची लबाडी केली, ''तुम्ही मरणार नाही तर तुम्ही देवासारखे व्हाल'' उत्पत्ती 2:16-17 व 3:5

**परिणाम.** आदामाने आज्ञा मोडली आणि लोकांना बरे-वाईट समजू लागले. प्रत्येक युगात, जुन्या व नव्या अशा दोन्ही कराराच्या काळात लोकांनी मानवी प्रयत्नांनी परिपूर्ण व्हावे यासाठी सैतान त्याना गळ घालत आहे. असे केल्याने लोक मरतील. त्यांचा न्याय होऊन नाश होईल. रक्तार्पणासाठी निर्दोष बळी अर्पण करणाऱ्या हाबेलाप्रमाणे देव त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्यांचे नेहमीच तारण करतो. जलप्रलयानंतर देवाने मानवी सरकारला हुकूम दिला की खून करणाऱ्यांना देहांतशासन केले पाहिजे, उत्पत्ती 9:6.

आदामाने आज्ञापालन केले नाही तर काय घडेल असे देवाने सांगितले, ते उत्पत्ती 2:16-17 मध्ये पाहा.

2) कृपेचा करार हा विश्वासाच्याद्वारे असणारा करार अब्राहामाशी केला, उत्पत्ती 12 पासून पुढे संपूर्ण पवित्र शास्त्रात हा करार आढळतो.

**मूळ उगम**- अब्राहामाने देवाच्या अभिवचनावर विश्वास ठेवला आणि देवाने त्याचा विश्वास नीतिमत्त्व असे गणला. उत्पत्ती 12:1-3 व उत्पत्ती 15:1-6.

परिणाम देव अब्राहामाची संतती असणाऱ्या येशूच्याद्वारे लोकांना आशीर्वाद देतो.

- पवित्र शास्त्रात यापुढे अगदी शेवटपर्यंत येणाऱ्या गोष्टी म्हणजे ह्याच अभिवचनाची परिपूर्ती होय. देवाने अब्राहामाशी केलेला करार हाच दोन्ही, जुन्या व नव्या करारांचा आधार पाया आहे.
- जुन्या व नव्या अशा दोन्ही करारांमध्ये देवाने आपल्या परिवर्तन घडवून आणणाऱ्या कृपेच्या द्वारे विश्वासूजनांचे रक्षण केलेले आहे.

3) नियमशास्त्राच्या द्वारे जुन्या करारातील व्यवस्था, निर्गम 20 पासून उर्वरित जुन्या करारात हे पाहायला मिळते.

**मूळ उगम**- देवाने मोशेच्या द्वारे सीनाय पर्वतावर इस्राएल राष्ट्राला जुना करार दिला.

**परिणाम**- येशू वगळता अन्य कोणाही व्यक्तीने जुन्या करारातील नियमांचे संपूर्णपणे पालन केलेले नाही. पापाने सोबत सार्वकालिक जीवन नाही तर मरण आणले. मोशेच्या नियमशास्त्राने फक्त पृथ्वीवरील तात्पुरत्या प्रतिफळाचे अभिवचन दिले पापांची क्षमा होण्याच्या त्यांच्या गरजेविषयी येथे शिकविले आहे.

- देवाने मोठ्या अद्भुत रीतीने इस्राएली गुलामांना मिसर देशातून बाहेर काढले आणि अशा प्रकारे देवाने सुटका केलेल्या लोकांचे नवे राष्ट्र स्थापन झाले.
- नव्यानेच स्वतंत्र राष्ट्र रानावनांत भटकत होते आणि चांगल्या उत्तम सरकारसाठी नियमांची आवश्यकता होती. निर्गम 18-20

4) मसीहा येण्याविषयीचा करार, हा दावीदाशी केला होता, 2 शमुवेल 7:8-17

**मूळ उगम** देवाने राजाला अभिवचन दिले की त्याच्या संततीपैकी एकजण न्यायाने राष्ट्रांवर राज्य करील. 'मसीहा' ह्या शब्दाचा अर्थ देवाच्या पवित्र आत्म्याचा अभिषेक झालेला असा आहे.

**परिणाम येशू,** देवाच्या अभिषिक्त संतानाने जुन्या व नव्या अशा दोन्ही करारातील सर्व करार यथायोग्य परिपूर्ण केले आहेत. पवित्र शास्त्र येशू व दावीद ह्या नावांचा उल्लेख अन्य कोणत्याही व्यक्तींच्या नावापेक्षा अधिक वेळा करते.

देव आपले सार्वकालिक राज्य कोणाच्या सिंहासनावरून स्थापन करणार आहे. ते यशया 9:6-7 मध्ये पाहा. (हे देवाने दावीदानंतर शेकडो वर्षांनी तर येशूच्या जन्मापूर्वी शेकडो वर्षे अगोदर यशया संदेष्ट्याला प्रकट केले).

येशू ही देवाने पाठविलेली अत्यंत पवित्र व्यक्ती आहे अशी खात्री पटविणाऱ्या कोणत्या गोष्टींचे येशूचे शिष्य साक्षीदार आहेत ते मत्तय 3:16-17 मध्ये पाहा.

5) नवा करार. एका परिपूर्ण सार्वकालिक राज्याचा हा करार सर्व विश्वासणाऱ्यांशी केला असून नव्या करारातील सर्व पुस्तकात तो आढळतो.

**मूळ उगम** येशूने प्रभुभोजनाच्या विधीची स्थापना केली, तेव्हा त्याने औपचारिकपणे नव्या कराराची घोषणा केली. येशूने मरण, मृतांतून पुन्हा उठणे, पित्याकडे वर परत जाणे आणि पवित्र आत्म्याला आमच्यामध्ये वस्ती करण्यास पाठविणे याद्वारे ह्या कराराची स्थापना केली.

**परिणाम** पश्चात्ताप करून ख्रिस्तावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाचा देवाच्या सार्वकालिक राज्यामध्ये 'नवा जन्म' झालेला आहे. विश्वासणारे ख्रिस्ताच्या वैश्विक, रहस्यमय शरीररूपी मंडळीचे भाग होतात. येशूच्या रक्तसिंचनामुळे त्यांच्या पातकांची क्षमा झालेली आहे. त्याच्या पुनरूत्थानामध्ये सामील होण्याने त्यांना नवे, पवित्र सार्वकालिक जीवन मिळते.

नव्या कराराच्याद्वारे देवाच्या लोकांचे कसे मार्गदर्शन होणार ते यिर्मया 31:31-34 मध्ये पाहा.

देवाने आपले वचन नमूद करून ठेवण्यासाठी माणसांचा व घटनांचा कसा उपयोग केला ते यिर्मया 36 मध्ये पाहा.

## 2. सहकाऱ्यांशी चर्चा करून आठवड्यातील कार्यक्रम ठरवा

- अद्याप पवित्र शास्त्र दररोज न वाचणाऱ्या आणि आपल्या कुटुंबियांसमवेत प्रार्थना न करणाऱ्या विश्वासणाऱ्यांची भेट घ्या. त्यांच्या बरोबर प्रार्थना करा आणि दररोज कौटुंबिक भक्ती सुरू करण्यास त्यांना साहाय्य करा.
- समजा, पवित्र शास्त्र अद्याप त्या भाषेत उपलब्ध नसेल किंवा लोकांना वाचता येत नसेल तर त्यांची भेट घेऊन त्यांना पवित्र शास्त्रातील गोष्टी शिकवा, म्हणजे ते त्यांच्या कुटुंबियांना व मित्रमंडळीला सांगतील.

## 3. सहकाऱ्यांशी येणाऱ्या उपासना सभेविषयी चर्चा करा.

यिर्मया 36 मधील यिर्मयाचा ग्रंथपट हा वृत्तांत सांगा किंवा त्याचे नाट्यीकरण करा.

पाच करारांचे स्पष्टीकरण करा, त्यांचे मूळ उगम, परिणाम आणि मुख्य कल्पना सांगा.

मुलांनी त्यांनी तयार केलेली कविता, नाटिका व प्रश्न सादर करण्यास सांगा,

प्रभुभोजनाची ओळख करून देण्यासाठी आदाम व हव्वा ह्यांच्यापासून सुरुवात करून संपूर्ण पवित्र शास्त्रामध्ये पातक झाकण्यासाठी देवाला निर्दोष रक्ताची आवश्यकता कशी आहे, याचे स्पष्टीकरण करा. हे मुख्य आध्यात्मिक सत्य आहे आणि आम्ही प्रभुभोजनाच्या द्वारे ख्रिस्ताचे शरीर व रक्त यामध्ये सहभागी होतो तेव्हा या सत्याची आठवण करतो, 1 करिंथ 10:16

आयोजित कार्यक्रमांची घोषणा करा.

दोन वा तीन जणांचे गट करून प्रार्थना करा.

**पाठ करा** 2 तीमथ्य 2:15 देवाचे वचन योग्यरीतीने वापरण्याबाबत.

Copyright 2003 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net